वर्ष - 9 । अंक -39 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

आज नववी माळ
सिद्धिदात्री देवी



**आतील पानांत**

- आशिया चषक घेऊन नक्वी पसार!
- भारतीय घरांमध्ये नवरात्रीच्या उत्सवाला विशेषतः महत्त्वाचे स्थान!
- अहिल्यानगरमध्ये पावसाची विश्रांती



www.mahaenews.com । मंगळवार, दि. 30 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**दिलासादायक पाऊल!** अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मुख्यमंत्री फडणवीसांचा शब्द

# दिवाळीपूर्वीच मिळणार मदत!

## "सर्व निकष बाजूला ठेवून सरसकट मदत, २,२०० कोटी रुपये मंजूर"

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**राज्यात मागील काही आठवड्यांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे हजारो शेतकऱ्यांचे पिके, घरे, जनावरांचे आश्रय आणि शेतमाल पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र या भागात विशेषतः मोठे नुकसान झाले असून हजारो शेतकरी कर्जाच्या गर्तेत आणि उपजीविकेच्या संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत एक मोठा दिलासादायक निर्णय घेतला आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी जाहीर केले की, "अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी २ हजार २०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता मंजूर करण्यात आला असून ही मदत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या हातात पोहोचेल."त्यांनी स्पष्ट केले की, या मदतीत कुठलेही गुंतागुंतीचे निकष लावले जाणार नाहीत, तर सरसकट सर्व शेतकऱ्यांना थेट मदत दिली जाणार आहे. त्यामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना या घोषणेमुळे दिलासा मिळाला आहे.

### मराठवाड्याला सर्वाधिक फटका

राज्यातील पावसाचा तडाखा सर्वाधिक मराठवाड्याला बसला. बीड, लातूर, नांदेड, हिंगोली, औरंगाबाद, जालना या जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी औसा तालुक्यातील उजणी गावाला व निलंगा तालुक्यातील विविध गावांना भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेतल्या आणि तातडीने मदतीची ग्वाही दिली.

"सरकार शेतकऱ्यांच्या सोबत आहे. कुठलेही अधिकचे निकष लावले जाणार नाहीत. गरज पडल्यास विद्यमान निकष शिथिल केले जातील. सरकारचे उद्दिष्ट एकच आहे – नागरिक केंद्रित मदत वेळेवर आणि प्रभावी स्वरूपात पोहोचवणे."

### पहिला हप्ता २,२०० कोटींचा मंजूर

राज्य सरकारने अतिवृष्टीग्रस्तांना मदतीसाठी २,२०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता मंजूर केला आहे. यातील निधी शेतकऱ्यांना थेट त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येणार आहे. दिवाळीपूर्वी मदत पोहोचेल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. यामुळे दिवाळीच्या आधीच शेतकऱ्यांच्या हातात आर्थिक मदत पोहोचून त्यांना तातडीचा दिलासा मिळणार आहे.

### मदतीत कोणत्या उपाययोजना?

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या मदतीत खालील तातडीच्या उपाययोजनांचा समावेश असेल :

**नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवणे**

मदत कॅम्प उभारणे
वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे
पिण्याच्या पाण्याची सोय करणे
चारा छावण्या सुरू करणे
तुटलेले रस्ते आणि पूल दुरुस्त करणे
वीजपुरवठा सुरळीत करणे
गॅस, पेट्रोल पंपांची दुरुस्ती
गावातील शाळा, अंगणवाड्या आणि सार्वजनिक इमारती दुरुस्त करणे
टंचाई निवारणासाठी विहिरी, टँकर आणि सिंटेक्स टाक्या उपलब्ध करून देणे

एकूण २२ प्रकारच्या तातडीच्या उपाययोजना या निधीतून केल्या जाणार आहेत.

### दिवाळीपूर्वी दिलासा

शेतकरी बांधवांना दिवाळीपूर्वी मदत मिळावी यासाठी सरकारने युद्धपातळीवर तयारी केली आहे. पहिल्या टप्प्यातील मदत २,२०० कोटी थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याने मदतीचे वितरण वेगाने आणि पारदर्शक पद्धतीने होईल.

### दुहेरी संकटावर उपाय

एका जिल्ह्यात टंचाई आणि अतिवृष्टी अशी दोन संकटे एकाच वेळी उद्भवल्यास, एकाच निधीचा लवचिक वापर करता येईल. जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष असलेल्या पालकमंत्र्यांना थेट निधी मंजूर करण्याचा अधिकार मिळाल्याने मदतीची प्रक्रिया आणखी गतिमान होईल.

### शेतकऱ्यांच्या अपेक्षा

शेतकऱ्यांचे पिके, जनावरे, घरे आणि शेतमाल उद्ध्वस्त झाला आहे. आता सरकारकडून मिळणारी मदत ही त्यांच्या जगण्याचा आधार ठरणार आहे.

### एका शेतकऱ्याने सांगितले :

"पिके गेली, घर कोसळले, जनावरांसाठी चारा नाही. सरकार मदत करत आहे ही आमच्यासाठी दिवाळीची खरी भेट आहे."

### राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री फडणवीस

यांच्या घोषणेमुळे दिलासादायक वातावरण निर्माण झाले आहे. २,२०० कोटींच्या पहिल्या हप्त्याने लाखो शेतकरी सण साजरा करू शकतील, तर जिल्हा वार्षिक निधीतील नवे धोरण भविष्यातील आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रभावी ठरेल. सरकारचा हा निर्णय शेतकरी बांधवांच्या जीवनात नवा आत्मविश्वास आणि आशेची किरणे निर्माण करणारा आहे.

## जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत नवे धोरण

राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आतापर्यंत जिल्हा वार्षिक योजनेंतील निधी केवळ टंचाई निवारणासाठी वापरला जाऊ शकत होता.

पण आता शासनाने नवा निर्णय घेतला असून या निधीचा वापर –

अतिवृष्टी, पूरस्थिती, गारपीट यांसारख्या आपत्तीच्या काळातही करता येणार आहे. जिल्हा वार्षिक निधीच्या ५ टक्क्यांपर्यंत खर्च जिल्हाधिकारी तातडीच्या मदतीसाठी करू शकतील. परिस्थिती गंभीर असल्यास जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने हा वापर १० टक्क्यांपर्यंत वाढवता येणार आहे. यामुळे आता आपत्तीग्रस्तांना मदतीसाठी राज्य सरकारची मंजुरीची वाट पाहावी लागणार नाही, तर थेट जिल्हाधिकारी स्तरावरून त्वरित मदत पोहोचवता येईल.

अजित पवारांची फटकेबाजी

## पुरुषांनी बैलाला साखळ्या घालतात

# सोनं हे महिलांना शोभून दिसतं!

## शहरातील ३२७ वाहनांची तपासणी

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**उपमुख्यमंत्री अजित पवारांची परखड मत व्यक्त करणारे नेते म्हणून ओळख आहे. अजित पवार जे नेहमीच स्पष्टपणे बोलतात. चाकण येथे सराफ दुकानाच्या उदघाटना प्रसंगी अजित पवारांनी सोन्याच्या दागिन्यावरून टोलेबाजी केली आहे. “सोन्याचे दागिने हे महिलांच्या अंगावर शोभून दिसतात. पुरुषांच्या अंगावर नाही. बैलाला साखळी घालतात तश्या सोन्याची साखळी घालून मिरवत जाऊ नका.” अशी मिश्किल टिपण्णी अजित पवारांनी पुरुषांवर केली आहे. अजित पवार हे चाकणमध्ये बोलत होते.**



अजित पवार म्हणाले, गोल्डन मॅन म्हणून काहींची ओळख आहे. अनेक गोल्डन मॅनने सोन्याचे कपडे शिवले. हे आपण पाहिलेलं आहे. पुढे अजित पवार म्हणाले, पुरुष आणि तरुण मंडळींना सांगायचं आहे. सोन्याचे दागिने हे आई, पत्नी, बहीण आणि लाडक्या मुलींच्या अंगावर शोभून दिसतं. पुरुषांच्या अंगावर शोभून दिसत नाही. पुरुषांनी अशा भानगडीत पडू नये. उगाचच त्या बैलाला एखादी साखळी घालतो तशा साखळ्या घालून मिरवू नका. अशी मिश्किल टिपण्णी अजित पवारांनी चाकणमध्ये भर कार्यक्रमात केली आहे. चाकण येथे अजित पवारांच्या हस्ते सराफ दुकानाच उदघाटन झालं. त्यानंतर छोट्याखानी झालेल्या भाषणात अजित पवारांनी फटकेबाजी केली आहे.उपमुख्यमंत्री अजित पवारांची परखड मत व्यक्त करणारे नेते म्हणून ओळख आहे. अजित पवार जे नेहमीच स्पष्टपणे बोलतात. चाकण येथे सराफ दुकानाच्या उदघाटना प्रसंगी अजित पवारांनी सोन्याच्या दागिन्यावरून टोलेबाजी केली आहे. “सोन्याचे दागिने हे महिलांच्या अंगावर शोभून दिसतात. पुरुषांच्या अंगावर नाही. बैलाला साखळी घालतात तश्या सोन्याची साखळी घालून मिरवत जाऊ नका.” अशी मिश्किल टिपण्णी अजित पवारांनी पुरुषांवर केली आहे. अजित पवार हे चाकणमध्ये बोलत होते. अजित पवार म्हणाले, गोल्डन मॅन म्हणून काहींची ओळख आहे. अनेक गोल्डन मॅनने सोन्याचे कपडे शिवले. हे आपण पाहिलेलं आहे. पुढे अजित पवार म्हणाले, पुरुष आणि तरुण मंडळींना सांगायचं आहे. सोन्याचे दागिने हे आई, पत्नी, बहीण आणि लाडक्या मुलींच्या अंगावर शोभून दिसतं. पुरुषांच्या अंगावर शोभून दिसत नाही. पुरुषांनी अशा भानगडीत पडू नये. उगाचच त्या बैलाला एखादी साखळी घालतो तशा साखळ्या घालून मिरवू नका. अशी मिश्किल टिपण्णी अजित पवारांनी चाकणमध्ये भर कार्यक्रमात केली आहे. चाकण येथे अजित पवारांच्या हस्ते सराफ दुकानाच उदघाटन झालं. त्यानंतर छोट्याखानी झालेल्या भाषणात अजित पवारांनी फटकेबाजी केली आहे.. अजित पवार जे नेहमीच स्पष्टपणे बोलतात. चाकण येथे सराफ दुकानाच्या उदघाटना प्रसंगी अजित पवारांनी सोन्याच्या दागिन्यावरून टोलेबाजी केली आहे. “सोन्याचे दागिने हे महिलांच्या अंगावर शोभून दिसतात. पुरुषांच्या अंगावर नाही. बैलाला साखळी घालतात तश्या सोन्याची साखळी घालून मिरवत जाऊ नका.” अशी मिश्किल टिपण्णी अजित पवारांनी पुरुषांवर केली आहे. अजित पवार हे चाकणमध्ये बोलत होते. अजित पवार म्हणाले, गोल्डन मॅन म्हणून काहींची ओळख आहे. अनेक गोल्डन मॅनने सोन्याचे कपडे शिवले. हे आपण पाहिलेलं आहे. पुढे अजित पवार म्हणाले, पुरुष आणि तरुण मंडळींना सांगायचं आहे. सोन्याचे दागिने हे आई, पत्नी, बहीण आणि लाडक्या मुलींच्या अंगावर शोभून दिसतं. पुरुषांच्या अंगावर शोभून दिसत नाही.

### तशा साखळ्या घालून मिरवू नका

अनेक गोल्डन मॅनने सोन्याचे कपडे शिवले. हे आपण पाहिलेलं आहे. पुढे अजित पवार म्हणाले, पुरुष आणि तरुण मंडळींना सांगायचं आहे. सोन्याचे दागिने हे आई, पत्नी, बहीण आणि लाडक्या मुलींच्या अंगावर शोभून दिसतं. पुरुषांच्या अंगावर शोभून दिसत नाही. पुरुषांनी अशा भानगडीत पडू नये. उगाचच त्या बैलाला एखादी साखळी घालतो तशा साखळ्या घालून मिरवू नका. अशी मिश्किल टिपण्णी अजित पवारांनी चाकणमध्ये भर कार्यक्रमात केली आहे.

# यकृत दात्यांची अदलाबदल करून प्रत्यारोपण!

## डॉक्टरांनी गुंतागुंतीच्या स्थितीवर शोधला अनोखा मार्ग

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गंभीर यकृतविकाराच्या दोन रुग्णांना तातडीने यकृत प्रत्यारोपणाची आवश्यकता होती. यासाठी या दोन्ही रुग्णांच्या पत्नी दाता म्हणून पुढे आल्या. मात्र, त्यांचे रक्तगट जुळत नसल्याने प्रत्यारोपण करणे शक्य नव्हते. अशा वेळी रुग्णालयाने पुढाकार घेऊन दात्यांची अदलाबदल करून या प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी केल्या. यामुळे दोन्ही रुग्णांना जीवदान मिळाले आहे..**



नांदेडमधील ४१ वर्षीय रुग्ण आणि चिपळूणचे ५३ वर्षीय रुग्ण हे यकृतविकाराने त्रस्त होते. त्यांचे यकृत निकामी झाले असल्याने प्रत्यारोपण हा एकमेव पर्याय शिल्लक होता. यकृताचा काही भाग दान म्हणून देण्यासाठी दोन्ही रुग्णांच्या पत्नींनी तयारी दर्शविली. मात्र, रुग्ण आणि त्यांच्या पत्नी यांचे रक्तगट भिन्न असल्याचे समोर आले. त्यामुळे हे प्रत्यारोपण शक्य नव्हते. एकाच वेळी दोन रुग्णांना यकृत प्रत्यारोपणाची गरज आणि दाता असलेल्या त्यांच्या पत्नी होत्या.

या रुग्णांचे रक्तगट हे एकमेकांच्या पत्नीच्या रक्तगटाशी जुळत होते. त्यामुळे डॉक्टरांनी दोन्ही रुग्णांच्या कुटुंबीयांचे समुपदेशन केले. एकमेकांना यकृतदान करून दोन्ही कुटुंबे त्यांच्या रुग्णाचा जीव वाचवू शकतात, असे डॉक्टरांनी त्यांना सांगितले. यावर दोन्ही रुग्णांच्या नातेवाइकांनी होकार दर्शविला. डॉक्टरांनी एकाच वेळी चार शस्त्रक्रिया कक्षांमध्ये या यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केल्या. या शस्त्रक्रियांसाठी सुमारे दहा ते बारा तासांचा कालावधी लागला. दोन्ही रुग्णांची प्रकृती सुधारत असून, त्यांच्या पत्नींनाही एका आठवड्यात रुग्णालयातून घरी सोडण्यात आले.

याबाबत खारघरमधील मेडिकव्हर हॉस्पिटलमधील यकृत प्रत्यारोपणतज्ज्ञ डॉ. शरण नारुटे म्हणाले की, एकाच कुटुंबातील रुग्ण आणि दात्याचा रक्तगट जुळत नसल्याने या रुग्णांसाठी ‘स्वॅप लिव्हर ट्रान्सप्लांट’ म्हणजेच दात्यांची अदलाबदल हा एकमेव पर्याय शक्य होता. अशा शस्त्रक्रियेत दोन कुटुंबांमधील दात्यांची अदलाबदल करून दोन्ही रुग्णांचे प्राण वाचवता येतात. दोन्ही रुग्णांच्या पत्नींनी दाखवलेले धैर्य आणि आमच्या वैद्यकीय पथकाचे कौशल्य यामुळे या शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या.

### दोन यकृत प्रतिहारी शिरांमुळे गुंतागुंत

यकृतदान करणाऱ्या दोन्ही दात्यांमध्ये दोन यकृत प्रतिहारी शिरा होत्या. ही यकृतातील मोठी शीर पोट, आतडे, प्लीहा आणि स्वादुपिंड यांसारख्या अवयवांतून रक्त गोळा करून यकृतापर्यंत पोहोचवते. त्यामुळे दात्यांच्या यकृताचा काही भाग काढून घेताना या शिरांचे व्यवस्थापन करण्याचे आव्हान डॉक्टरांसमोर होते. डॉक्टरांनी ही गुंतागुंत कमी करून शस्त्रक्रिया यशस्वी केल्या.

ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न

चाकणची वाहतूक कोंडी फोडण्याचे पालकमंत्र्यांचे आश्वासन

# नदीचे पात्र कमी केल्यामुळेच पूर परिस्थिती!

## अजित पवार: पवना, मुळा, इंद्रायणीसह राज्यातील सर्व नद्यांची हीच परिस्थिती

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पवना, मुळा, इंद्रायणीसह राज्यातील सर्व नद्यांचे पात्र कमी केल्यामुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यातील अनेक नद्यांना पूर आला आहे.प्रचंड नुकसान झाले असून यातून आता ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न निर्माण झाला आहे.**



त्यामुळे नदी सुधार प्रकल्प राबवताना नदीवरील पावसाळ्यात उद्भवणाऱ्या समस्या, नदी स्वच्छता, जलप्रवाहातील अडथळे दूर करण्यासह पूरस्थिती नियंत्रणाच्या दृष्टिने उपाययोजना राबवाव्यात, सर्व विभागांनी यापूर्वीसारखेच समन्वय ठेवून काम करावेत असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.

पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील मुळा, मुठा, पवना आणि इंद्रायणी नदीवर राबवण्यात येणाऱ्या नदी सुधार प्रकल्पांबाबत आज उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेसह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), जलसंपदा विभाग, केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र (सीडब्ल्यूपीआरएस) अशा नदी सुधार प्रकल्पासंबंधित सर्व शासकीय यंत्रणांची संयुक्त बैठक आज पिंपरी चिंचवड महापालिका मुख्य इमारतीतील कै. मधुकर पवळे सभागृह येथे पार पडली. यावेळी ते बोलत होते.

बैठकीला राज्याच्या विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्यासह पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम,पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, पीएमआरडीए अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला,पुणे महापालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, शहर अभियंता मकरंद निकम, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता दिनकर गोजारे, वन विभागाचे प्रादेशिक उपवनसंरक्षक महादेव मोहिते, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता हनुमंत गुनाले, डॉ. हेमंत धुमाळ, कार्यकारी अभियंता दि. म. डूबल, सीएमईचे कर्नल प्रभात सिंग, जलविज्ञान तज्ज्ञ अविनाश सर्वे, केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्राचे संचालक श्री शैलम, शास्त्रज्ञ अनिलकुमार यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पुणे महापालिका आणि पिंपरी चिंचवड महापालिका नदी सुधार प्रकल्प समन्वयाने राबवत आहेत. या अनुषंगाने महापालिकांनी पावसाळ्यात उद्भवणारी परिस्थिती पाहून योग्य निर्णय घ्यावे असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले ते पुढे म्हणाले, पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीसह अनेक नद्यांचे पात्र कमी केले जात आहे. यामुळे पुरजन्य परिस्थिती निर्माण होते. म्हणूनच पर्यावरण वाद्यांचा या नदी सुधार प्रकल्पांना विरोध आहे. मुळा आणि मुठा नदीच्या सुधारण्यासाठी पुण्याच्या बाजूचा ठेकेदार आणि पिंपरीच्या बाजूचा ठेकेदार वेगळा आहे. यामुळे समन्वयाचा अभाव आहे. याकडे महापालिकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. आत्ता राज्यातील अनेक नद्यांना पूर आला, प्रचंड नुकसान झालं. ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न निर्माण झाला आहे. परतीच्या पावसाचे संकटही राज्यासमोर आहे त्यामुळे यातून योग्य तोडगा काढणे गरजेचे आहे.

### ओला दुष्काळ जाहीर करणार का?

-मुख्यमंत्री आणि सरकार म्हणून आम्ही सांगितलं आहे.शेतकऱ्यांना असं काही द्यावं लागणार आहे, जेणेकरून सरकार त्यांच्या पाठीशी आहे, असं वाटायला हवं. दिवाळीपर्यंत बळीराजाला या संकटातून बाहेर काढण्याचे नियोजन आहे.आत्ता तातडीची 5000 रुपये, अन्न-धान्य, कपडे, निवारा अशी मदत केली जातीये. कॅबिनेट बैठकीमध्ये ओला दुष्काळ जाहीर करायचा का यावर नक्कीच चर्चा होईल.

### शेतकऱ्यांचा रोष असल्याची पालकमंत्र्यांची कबुली

राज्यामध्ये विविध ठिकाणी सर्व मंत्र्यांनी दौरे केलेत. शेतकऱ्यांचा रोष, नाराजी, राग, विरोध पाहायला मिळाला. जेंव्हा घरदार उध्वस्त होतं, शेतीचं प्रचंड नुकसान होतं, जमीन वाहून जाते, तेंव्हा साहजिक अशा प्रतिक्रिया उमटतात. पण आम्ही या शेतकऱ्यांना कशी मदत करता येईल, त्याअनुषंगाने निर्णय घ्यायचं ठरवलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीचा दौरा केलाय. पंतप्रधान नरेंद्र मोदींना झालेल्या नुकसानीची माहिती दिलीये, शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळावी अशी मागणी केलेली आहे. यासाठी विविध विभागांची मदत लागणार आहे. सरकार याबाबत उद्याच्या बैठकीत निर्णय घेईल.

### पाऊस थांबल्यानंतर चाकणमधील रस्त्यांचे डांबरीकरण

पाऊस थांबल्यावर डांबरीकरणाचे काम सुरू होईल. तूर्तास चाकण परिसरातील अतिक्रमण हटवले जातायेत. आपल्याला जे साध्य करायचं आहे, ते पाऊस थांबल्यावर करता येईल. चालू पावसात जी कामं करता येतील तेवढी सध्या कामं करतोय.

# आळंदीतील 23 इमारती धोकादायक

## नागरिकांना नोटीस; नगरपालिकेच्या कारवाईकडे लक्ष

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आळंदी शहरातील धोकादायक जीर्ण झालेल्या इमारती मालमत्ताधारकांनी स्वतःहून पाडून घ्याव्यात, अन्यथा नगरपरिषद त्यावर रीतसर कारवाई करेल. मालमत्ताधारकांना स्वतःहून इमारती पाडून घेण्यासाठी मंगळवार (दि ३०) पर्यंतची मुदत नगर परिषदेने दिली असून शहरातील २२ मालमत्ताधारकांना याबाबत नगरपरिषदेने नोटिसा दिल्या आहे.**



आळंदी नगरपरिषदेने शहरातील धोकादायक तसेच जुनाट झालेल्या मोडकळीस आलेल्या इमारतींचा सर्वेक्षण नुकतेच बांधकाम विभागामार्फत केले आहे. अनेक इमारती जुन्या माती बांधकामातील असून तर काही इमारती अनेक वर्षांपासून वापरात नसल्याने मोडकळीस आल्या आहेत. तर काही जुनाट इमारतीखाली कोणत्याही प्रकारची दुरुस्ती न करता नागरिक व्यवसाय करत आहेत. यामुळे भविष्यात जीवित हानी होऊ नये यासाठी नगरपरिषदेच्या वतीने धोकादायक इमारतीच्या मिळकतधारकांना नोटीस दिल्या आहेत. मंगळवारनंतर जर नगरपरिषदेने कारवाईस सुरुवात केली तर बांधकाम पाडण्यासाठीचा खर्च संबंधित मिळकत धारकांवर टाकण्यात येईल. जवळपास नोटीस दिलेल्या इमारती या संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर परिसर आणि प्रदक्षिणा रस्त्याच्या आतील बाजूस आहेत.यामुळे आता पुढील लक्ष नगरपालिकेच्या कारवाईकडे लागले आहे.

“ आळंदी नगरपरिषदेने यापूर्वीही अनेकदा नोटीस मिळकतधारकांना दिलेल्या आहेत. शहरामध्ये कार्तिकी, आषाढीमध्ये दोन मोठ्या वाऱ्या होत असून लाखोंचा जनसमुदाय आळंदीत येतो. याचबरोबर एकादशी तसेच अन्य सणाच्या दिवशी आळंदीत गर्दी असते. अशावेळी धोकादायक इमारत पडून जीवितहानी झाल्यास मोठा धोका निर्माण होऊ शकतो. तसेच मूळ मिळकतधारकांना याचा धोका आहे. यासाठी नगरपरिषदेने इमारत पाडून घेण्याबाबतच्या नोटिसा संबंधित मिळकतधारकांना दिल्या आहेत.

**- माधव खांडेकर,** मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद



भूमिका

# दिवास्वप्नांना स्वागताई तडे!

**सत्ताधाऱ्यांनी विकासाची स्वप्ने पाहणे- दाखविणे गरजेचेच असते, पण या स्वप्नांना वास्तवाचा, प्रबळ इच्छाशक्तीचा आणि प्रामाणिक प्रयत्नांचा आधार नसेल, तर त्या स्वप्नांतून समाज जेवढा लवकर जागा होईल, तेवढे उत्तम...**

शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्यानंतर उसळलेला जनक्षोभ फक्त पुतळ्यापुरता मर्यादित राहात नाही. पायाभूत सुविधांच्या निर्मितीची क्षमता, भ्रष्टाचार हे मुद्देदेखील या आंदोलनामुळे राजकीय पटलावर येतात. याचे कारण आहे पुतळ्याच्या पडण्याला लाभलेली पार्श्वभूमी. ही पार्श्वभूमी राष्ट्रीय महामार्गावर पसरलेल्या खड्ड्यांच्या जाळ्याची, पडणाऱ्या पुलांची, विमानतळाची होती. ही पार्श्वभूमी नसती तरीही महाराष्ट्रात पुतळा प्रश्नावर एवढा जनक्षोभ उसळला असताच. पण साऱ्या देशभर हा मुद्दा चर्चिला जाण्याला पायाभूत सुविधांच्या निर्मितीबद्दल उपस्थित होणारे गंभीर प्रश्न हे एक महत्त्वाचे कारण निश्चितच आहे.२०१४ सालच्या निवडणुकांच्या निकालानंतर देशात विकाससंदर्भात मोठी आशा निर्माण झाली होती, उत्साह होता. अगदी अल्पावधीत भारत विकासाच्या रस्त्यावर भरधाव प्रवास करू लागणार आणि प्रगत देशांच्या पंक्तीत जाऊन बसणार अशी आशा होती. त्याआधीच्या दहा वर्षांत देशाचा सरासरी आर्थिक वृद्धिदर हा स्वतंत्र भारताच्या



इतिहासातील सर्वांत जास्त होता. शेवटच्या दोन वर्षांत तो घसरला तरीही दहा वर्षांतील सर्वोच्च सरासरी वृद्धी दराने लोकांच्या आकांक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. आणि या आकांक्षांचे प्रतिनिधित्व देशातील तथाकथित मध्यम वर्गाने केले. 'तथाकथित' अशासाठी की स्वतःला मध्यमवर्ग म्हणवणारा हा वर्ग प्रत्यक्षात देशातील सर्वांत वरच्या आर्थिक थरातील दहा टक्के लोकांमधील आहे. (देशातील ८० टक्के लोकांची प्रति माह प्रति कुटुंब मिळकत ही २० हजार रुपयांपेक्षा कमी आहे). या तथाकथित मध्यमवर्गासाठी प्रगत देशातील जीवनमान खूप लांबचे ध्येय नव्हते. या वर्गातील एक घटक तसे जीवनमान आधीच जगू लागला होता.असे असले तरीही या वर्गाची स्वप्ने, आकांक्षा आणि आर्थिकदृष्ट्या त्यांच्या खाली असलेल्या ८० टक्के लोकांच्या आकांक्षा यात काही भेद नव्हता. बहुपदरी रस्त्यांवरून मोठा टोल भरून फक्त श्रीमंतांच्या मोटारीच धावणार असे नव्हते. याच रस्त्यांमुळे आणि पायाभूत सुविधांमुळे देशात परकीय गुंतवणूक येणार होती आणि या ८० टक्के लोकांना रोजगार मिळणार होते. मोठे उड्डाणपूल, बहुपदरी रस्ते, बुलेट ट्रेन ही देशाच्या आकांक्षांची, स्वप्नांची प्रतीके ठरली, मात्र आता या स्वप्नांना तडे जाऊ लागले आहेत. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पडणे, त्यातील कथित भ्रष्टाचाराची चर्चा सुरू होणे किंवा पावसाळ्यानंतर इतर पायाभूत सेवांच्या गुणवत्तेसंदर्भात, निर्मितीतील भ्रष्टाचारासंदर्भात प्रश्न निर्माण होणे हे ते तडे आहेत. पण भव्य स्वप्नांना एवढ्या अल्पावधीत तडे का जावेत? आपली एक आशा होती की पायाभूत सेवांची जलद निर्मिती करून आपण जागतिक भांडवलाच्या गुंतवणुकीचे सर्वांत आकर्षक स्थान ठरू. कारण ते स्थान क्षी जिनपिंग यांच्या व्यक्तिकेंद्री एकाधिकारशाहीमुळे चीन गमावण्याची शक्यता आहे आणि जागतिक भांडवली बाजार चीनसाठी पर्यायाच्या शोधात आहे, पण दुर्दैवाने ते स्थान आपल्याला प्राप्त करता आलेले नाही.दोन विशिष्ट उद्योगसमूहांना प्राधान्य देण्याचे केंद्र सरकारचे धोरण हे यामागचे एक महत्त्वाचे कारण असल्याची टीका केली जाते. इतरही कारणे आहेत. मुद्दा असा की राजकीयदृष्ट्या ताकदवान नेत्याने काही निर्णय धडाक्यात, नाट्यमय पद्धतीने घेतले आणि देशाच्या विकासाची गती वाढली, असे काही होणार नाही. मार्ग खडतर आहे. प्रतिमांचे तडे हे स्वप्नांचे तडे ठरण्यामागे या खडतर वास्तवाचे होऊ लागलेले आकलन आहे. उत्साह असणे, आकांक्षा असणे ही चांगलीच गोष्ट आहे, पण त्याचा परिणाम म्हणून आपण आता कोठे आहोत याचे भानच सुटणे हे जास्त गंभीर आहे. आणि गेल्या दहा वर्षांत नेमके असेच घडले. आर्थिक महासत्ता, विश्वगुरू या सर्व घोषणांमध्ये आपले वास्तवतेचे भानच हरवले होते. विकासाच्या प्रश्नाच्या जटिलतेचे आकलन करून घेण्यास समाजाचे वैचारिक नेतृत्व करणारा आपला हा तथाकथित मध्यमवर्ग तयारच नव्हता.

## प्रासंगिक »

# दावा, दवा, दुआ!

***शास्त्रकाट्याच्या कसोटीवर निर्माण केलेल्या औषधास दिलेली विक्री परवानगी मागे घ्यायची वेळ सरकारवर आली असल्यास, संबंधितांवर काय कारवाई करणार?***

केंद्र सरकारच्या आरोग्यसेवा महासंचालकांनी प्रेसवू ( PRESVU) नावाच्या द्रावणास आधी नेत्रौषध म्हणून विक्रीची परवानगी दिली आणि नंतर ती मागे घेतली. सरकारचे म्हणणे या 'औषधा'चा प्रचार ज्या पद्धतीने केला जात होता ते पाहता या 'औषधा'चा गैरवापर होण्याचा धोका होता. तो टाळण्यासाठी त्याच्या विक्रीस दिलेली परवानगी मागे घेत असल्याचे या यंत्रणेने स्पष्ट केले. वरील तपशिलात औषध हा शब्द अवतरणात लिहिला याचे कारण आपल्याकडे या संदर्भात सरसकट दिसणारे गैरसमज. तज्ज्ञ वैद्याकाच्या मार्गदर्शनाखाली जे सेवन करायचे असते त्यास 'औषध' म्हणणे अपेक्षित आहे. पपोटाचे, त्वचेचे विकार आदीसाठींची औषधे आपल्याकडे सर्रास किराणा वस्तूप्रमाणे सहज विकली जात असतात. ज्या औषधांस 'डॉक्टरांची चिठ्ठी' आवश्यक नसते.

**युक्रेनमधील संघर्षाला अडीच वर्षे होऊनही तो थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनीच गेल्या आठवड्यात शांतता-चर्चेसाठी ब्राझील, 'ग्लोबल साउथ'मधल्या भारत वा ब्राझीलसारख्या देशांकडून मध्यस्थीची कल्पना युक्रेनच्या अध्यक्षांनाही मान्य होणारी आहे.**

# ...तरीसुद्धा युक्रेन-शांतता प्रयत्नांत भारत हवाच!

भारताला या शांतता-प्रस्थापन राजनीतीमध्ये खरोखरच मोठे स्थान असेल का, हा प्रश्न आपल्या देशात विचारला जातो. अर्थातच, अशा प्रकारच्या शांतताकार्यात प्रत्यक्ष सहभागी होण्यापूर्वी भारतीय राजनीतिज्ञांना आपल्या क्षमतांचा आणि मर्यादांचाही पक्का अंदाज असणे आवश्यक आहे. 'हे युग युद्धाने प्रश्न सोडवण्याचे नाही' अशी भारताची भूमिका जगजाहीर आणि जगन्मान्यही आहे, पण भूमिका मांडणे निराळे आणि प्रत्यक्ष शांततेसाठी वाटाघाटींत उतरणे निराळे. युक्रेन- रशिया संघर्ष थांबवताना खरी तडजोड ही एका बाजूला अमेरिका व अमेरिकेच्या बाजूने असलेली युरोपीय राष्ट्रे आणि दुसऱ्या बाजूला पुतिन यांचा रशिया यांच्यातच होणार आहे- त्या तडजोडीतून नवी समीकरणे उदयाला येऊ शकतात. हे ओळखूनच आपण या आव्हानाकडे पाहण्याची गरज आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर, १९४५ साली तसेच १९९१ नंतर म्हणजे 'शीतयुद्ध' संपल्यानंतरच्या काळात युरोपची



'घडी बसवण्या'चे काम अमेरिका आणि रशिया यांनी एकमेकांच्या साथीने केलेले असल्याचा इतिहास आधुनिक काळात प्रथमच बदलतो आहे. रशियाला युरोपमध्ये नवी रचना हवी आहे, तर युरोपीय देशांच्या संरक्षण- संस्थात्मकतेची फेररचना करू शकण्याइतकी क्षमता आजही फक्त अमेरिकेकडे आहे. अमेरिकी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आणि रशियाचे पुतिन यांची जून २०२१ मध्ये जीनिव्हात झालेली चर्चा जर फिसकटली नसती, तर कदाचित युक्रेन-संघर्ष टळलाही असता, हेदेखील वास्तव आहेच. त्यामुळे अमेरिकेवर बरेच काही अवलंबून आहे आणि येत्या नोव्हेंबरात अमेरिकेमध्ये नवे राष्ट्राध्यक्ष निवडले जातील त्यावरही शांततेची मदार राहील, हे युक्रेनला आणि रशियालाही पुरेपूर माहीत आहे. अमेरिकेतील राष्ट्राध्यक्ष निवडणुकीतच ढवळाढवळ करण्याचे आरोप पुतिन यांच्यावर (२०१६ मध्ये) झालेले होते. तसा प्रकार पुतिन यांनी यंदा पुन्हा केलाच, तरीही युक्रेनचे फार नुकसान होऊ नये या दृष्टीने युक्रेनी राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी आतापासूनच मोर्चेबांधणी सुरू केल्याचे दिसते. झेलेन्स्की पुढल्याच महिन्यात पुन्हा अमेरिकाभेटीस जात आहेत. तिथे न्यू यॉर्कमध्ये, संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेतही त्यांचे भाषण ठरलेले आहे आणि त्याच वेळी अमेरिकेतील अनेक नेत्यांच्या गाठीभेटींतून शांततेसाठी नव्या वाटा शोधण्याचा प्रयत्न ते करणार, हेही उघड आहे.जगातल्या- विशेषतः युरोपातल्या अन्य देशांच्या नेत्यांनीही शांततेसाठी पाऊल पुढे टाकल्याचे गेल्या काही दिवसांत दिसले. जर्मनीचे चॅन्सेलर ओलाफ शोल्झ यांनी गेल्याच आठवड्यात युक्रेनसंघर्ष थांबवण्यासाठी काही सूचना जाहीरपणे केल्या.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## अतिवृष्टीचा तडाखा

## अनेक गावे, शेती मात्र पाण्याखालीच!

# अहिल्यानगरमध्ये पावसाची विश्रांती!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सततच्या अतिवृष्टीने बेजार झालेल्या जिल्ह्याला पावसाने काल, रविवार दुपारपासून विश्रांती घेतल्याने दिलासा मिळाला आहे. त्यामुळे नद्या, ओढे, नाले यांची पूर परिस्थिती ओसरली असली तरी धरणांच्या जलाशयाचा फुगवटा व साठा नियंत्रित करण्यासाठी धरणातून पाणी सोडल्याने, शेतात साचलेल्या पाण्याचा निचरा न झाल्याने अनेक गावे अद्याप पाण्यातच आहेत. परिणामी पंचनाम्यांमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. आपत्ती निवारणाची बचाव पथकेही आता विसावली आहेत.**

### १२ सप्टेंबरपासून अतिवृष्टी



जिल्ह्यास गेल्या १२ सप्टेंबरपासून अतिवृष्टीने झोडपून काढण्यास सुरुवात केली. ती १९ सप्टेंबरपर्यंत लागोपाठ सुरूच होती. दोन दिवसांचा खंड पडल्यानंतर पुन्हा दिनांक दि. २२ पासून २८ च्या सकाळपर्यंत अतिवृष्टीने जिल्ह्याला झोडपले. धरणे, तलाव, बंधारे आधीच तुडुंब भरली होती. अतिवृष्टीने जलाशये प्रचंड प्रमाणावर फुगली आणि त्यांनी आजूबाजूची शेती, गावे व्यापून टाकली. तत्पूर्वी मे महिन्यातही जिल्ह्याच्या बहुतांशी भागाला अतिवृष्टीने झोडपले होतेच.खरीप हंगामाच्या सुरुवातीला चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी जोमाने सोयाबीन, मका, तूर, कांदा, भूईमूग आदी पिकांची पेरणी केली. काही ठिकाणी सोयाबीनच्या बियाण्यांत शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याच्याही तक्रारी होत्या. नंतर पावसाने ताण दिल्याने दुबार पेरणीही करावी लागली होती. सप्टेंबरमध्ये मात्र अचानक अतिवृष्टीचे अस्मानी संकट कोसळले आणि त्यांनी शेतकऱ्यांना देशोधडीला लावले. अहिल्यानगर, पाथर्डी, शेवगाव, जामखेड, पारनेर, श्रीगोंदा, नेवासे आदी भागांत पंधरा दिवसांतच सरासरीपेक्षा दीडपट ते दुप्पट पाऊस झाला. पुराच्या पाण्याने शेतीही खरवडून गेली. सततच्या अतिवृष्टीने पिके सडू लागली आहेत. शेतात केवळ पीकच नाही तर मातीही शिल्लक राहिलेली नाही. अनेक ठिकाणी तर शेतात केवळ आता दगडगोटेच दिसत आहेत. कपाशी पिकावर मर रोग वाढू लागला आहे. भुईमूग पाण्याखाली गेला आहे. पूर्ण खरीप हंगामच पाण्यात गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांपुढे दिवाळी सण कसा साजरा करायचा, असा प्रश्न पडला आहे. शेतकऱ्यांचे नुकसान केवळ शेती पिकांपुरतेच मर्यादित नाही. दुभती जनावरेही अनेक ठिकाणी वाहून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जोडधंद्यालाही मोठा फटका बसलेला आहे.अतिवृष्टीने बाधित झालेल्या नागरिकांना मदत म्हणून राज्य सरकारने १० किलो तांदूळ, १० किलो गहू व ५ लिटर रॉकेल मोफत देण्याचा आदेश काढला आहे. मात्र त्यासाठी सन २०१९ व २०२४ मधील निकषांचे, अटी व शर्तींचे पालन करण्यास जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले आहे.सततच्या अतिवृष्टीने बेजार झालेल्या जिल्ह्याला पावसाने काल, रविवार दुपारपासून विश्रांती घेतल्याने दिलासा मिळाला आहे. त्यामुळे नद्या, ओढे, नाले यांची पूर परिस्थिती ओसरली असली तरी धरणांच्या जलाशयाचा फुगवटा व साठा नियंत्रित करण्यासाठी धरणातून पाणी सोडल्याने, शेतात साचलेल्या पाण्याचा निचरा न झाल्याने अनेक गावे अद्याप पाण्यातच आहेत. परिणामी पंचनाम्यांमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. आपत्ती निवारणाची बचाव पथकेही आता विसावली आहेत जिल्ह्यास गेल्या १२ सप्टेंबरपासून अतिवृष्टीने झोडपून काढण्यास सुरुवात केली. ती १९ सप्टेंबरपर्यंत लागोपाठ सुरूच होती. दोन दिवसांचा खंड पडल्यानंतर पुन्हा दिनांक दि. २२ पासून २८ च्या सकाळपर्यंत अतिवृष्टीने जिल्ह्याला झोडपले. धरणे, तलाव, बंधारे आधीच तुडुंब भरली होती. अतिवृष्टीने जलाशये प्रचंड प्रमाणावर फुगली आणि त्यांनी आजूबाजूची शेती, गावे व्यापून टाकली. तत्पूर्वी मे महिन्यातही जिल्ह्याच्या बहुतांशी भागाला अतिवृष्टीने झोडपले होतेच.खरीप हंगामाच्या सुरुवातीला चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी जोमाने सोयाबीन, मका, तूर, कांदा, भूईमूग आदी पिकांची पेरणी केली. काही ठिकाणी सोयाबीनच्या बियाण्यांत शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याच्याही तक्रारी होत्या. नंतर पावसाने ताण दिल्याने दुबार पेरणीही करावी लागली होती. सप्टेंबरमध्ये मात्र अचानक अतिवृष्टीचे अस्मानी संकट कोसळले आणि त्यांनी शेतकऱ्यांना देशोधडीला लावले. अहिल्यानगर, पाथर्डी, शेवगाव, जामखेड, पारनेर, श्रीगोंदा, नेवासे आदी भागांत पंधरा दिवसांतच सरासरीपेक्षा दीडपट ते दुप्पट पाऊस झाला. पुराच्या पाण्याने शेतीही खरवडून गेली. सततच्या अतिवृष्टीने पिके सडू लागली आहेत.

शेतात केवळ पीकच नाही तर मातीही शिल्लक राहिलेली नाही. अनेक ठिकाणी तर शेतात केवळ आता दगडगोटेच दिसत आहेत. कपाशी पिकावर मर रोग वाढू लागला आहे. भुईमूग पाण्याखाली गेला आहे. पूर्ण खरीप हंगामच पाण्यात गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांपुढे दिवाळी सण कसा साजरा करायचा, असा प्रश्न पडला आहे. शेतकऱ्यांचे नुकसान केवळ शेती पिकांपुरतेच मर्यादित नाही. दुभती जनावरेही अनेक ठिकाणी वाहून गेली आहेत.

### शिधापत्रिकाधारकांना मदत

या अटी व शर्ती क्लिष्ट असल्याने मोफत धान्य वाटप अद्याप सुरू करण्यात आलेले नाही. यासाठी बाधिताची शेती किमान पाण्याखाली असावी, घर पूर्ण पडलेले असावे यासह इतर नियम लागू आहेत तसेच अधिकारी पातळीवर करावयाची कार्यवाही अतिशय क्लिष्ट असल्याने जिल्हा पुरवठा विभागाने ऑक्टोबर व नोव्हेंबरमधील स्वस्त धान्य दुकानदारांना आगाऊ देऊन शिधापत्रिकाधारकांना मदत करण्याचे प्रयत्न सुरू केले.

# शेतकरी कुटुंबातून उद्योगविश्वाच्या शिखरावर

## रविंद्र माणगावे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे नवे अध्यक्ष

। सांगली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सांगली जिल्ह्याच्या सावळवाडी या साध्या खेड्यात जन्मलेले आणि शेतकरी कुटुंबातून उद्योगविश्वात झेप घेतलेले श्री. रविंद्र माणगावे हे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अॅग्रिकल्चर या राज्यातील सर्वोच्च संस्थेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवडून आले.**



मुंबई येथील मुख्यालयात त्यांनी मानाचा पदभार स्वीकारताच सांगलीच्या भूमीने पहिल्यांदाच हा सन्मान गवसविला.शेतकरी पार्श्वभूमीतून आलेले माणगावे यांनी स्वतःच्या परिश्रमाने उद्योगक्षेत्रात भक्कम ओळख निर्माण केली. चेंबरमध्ये विविध पदांवर निष्ठेने कार्य करत त्यांनी आज सर्वोच्च स्थान मिळवले आहे. त्यांच्या या निवडीमुळे सांगली जिल्ह्याची कर्तबगार परंपरा उज्ज्वल झाली आहे. या ऐतिहासिक क्षणी विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, माजी उपाध्यक्ष संतोष मंडलेचा, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, संजय सोनवणे, दीपक परब, शंकर शिंदे, उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन अंजु सिंघल, कार्यकारिणी सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, वेदांशू पाटील, मनीष पाटील, सरकार्यवाह श्रीमती शितल पांचाल, माजी सरकार्यवाह सुरेश घोरपडे, उपसचिव नितीन शेलार आदी मान्यवर उपस्थित होते.

### जिल्हा आणि राज्याचा सन्मान

"सावळवाडीचा हा पुत्र महाराष्ट्राच्या व्यापार–उद्योग क्षेत्राचे नेतृत्व करणार," या भावना व्यक्त करत सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व सभासदांनी त्यांचे अभिनंदन केले. सांगलीच्या मातीतून उगवलेले हे नेतृत्व राज्याच्या उद्योगविश्वाला दिशा देईल, असा ठाम विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

युद्धविरामासाठी नवा प्रस्ताव

## ट्रम्प-नेतान्याहू भेटीत शिक्कामोर्तब होण्याची शक्यता

# गाझात युद्धविरामासाठी नवा प्रस्ताव!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**‘गाझामध्ये युद्धविरामासाठी अमेरिकेबरोबर नवे नियोजन करीत आहे. सविस्तर तपशील तयार करीत आहोत,’ असे प्रतिपादन इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी रविवारी केले. नेतान्याहू लवकरच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेणार आहेत. नेतान्याहू यांच्या या वक्तव्यामुळे गाझा पट्टीतील संघर्ष थांबण्याबाबत आशावाद निर्माण झाला आहे.**

## नेतान्याहू यांच्यावर आंतरराष्ट्रीय



सूत्रांनी नाव न घेण्याच्या अटीवर सांगितले, की संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने अरब देशांसमोर संबंधित प्रस्ताव समोर ठेवला आहे. युद्धविरामासाठी २१ नवे मुद्दे आहेत. त्यानुसार तातडीने युद्धविराम लागू होणार असून, इस्रायलच्या ओलिसांना हमासने ४८ तासांत सोडावे, अशी अट आहे. इस्रायलच्या फौजा हळूहळू नंतर माघारी जातील.गाझा पट्टीत युद्धविराम व्हावा, यासाठी नेतान्याहू यांच्यावर आंतरराष्ट्रीय दबाव आहे. येथे आतापर्यंत ६६ हजार पॅलेस्टिनींचा मृत्यू झाला आहे. ट्रम्प-नेतान्याहू यांच्या भेटीत हा संघर्ष संपविण्यासाठी ट्रम्प नवा प्रस्ताव समोर ठेवण्याची शक्यता आहे.युद्धविरामावर आम्ही नियोजन करीत आहोत. त्याला अंतिम रूप आलेले नाही. ट्रम्प यांच्या सहकाऱ्यांबरोबर आम्ही काम करीत आहोत. आम्ही यामध्ये नक्की पुढे जाऊकतारची राजधानी दोहा येथे इस्रायली लष्कराने काही दिवसांपूर्वी हल्ला केला होता. हमासच्या नेतृत्वाला लक्ष्य करण्यासाठी हा हवाई हल्ला केल्याचं इस्रायली सैन्यांनी सांगितलं होतं. मात्र, या हल्ल्यानंतर कतारने आक्रमक भूमिका घेतली होती आणि कतार-इस्रायल यांच्यातील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं होतं. इस्रायलच्या हल्ल्यानंतर कतार चांगलाच ॲक्शन मोडवर आला होता. यातच कतारमध्ये अमेरिकेचा लष्करी तळ असल्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या. त्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी याबाबत इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्यावर नाराजी व्यक्त केली होती. आता बेंजामिन नेतान्याहू यांनी दोहा येथील हल्ल्याबाबत कतारची माफी मागितल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त रॉयटर्सच्या हवाल्याने इंडिया टुडेनी दिलं आहे.वृत्तानुसार, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी अमेरिकेच्या व्हाईट हाऊसमधून कतारच्या पंतप्रधानांना फोन करत माफी मागितली आहे. सोमवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची व्हाईट हाऊसमध्ये बेंजामिन नेतान्याहू यांनी भेट घेतली. या भेटी दरम्यान डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेतान्याहू यांच्यात बराच वेळ चर्चा झाली. त्यानंतर बेंजामिन नेतान्याहू यांनी कतारची माफी मागितल्याचं वृत्तात म्हटलं आहे.या महिन्याच्या सुरुवातीला कतारच्या दोहामध्ये इस्रायलच्या सैन्यांनी हमासच्या वरिष्ठ नेत्यांना लक्ष्य करत हल्ला केला होता. या हल्ल्याबाबत आता बेंजामिन नेतान्याहू यांनी कतारची माफी मागितली आहे. इस्रायलने केलेल्या हल्ल्यात हमासचे वरिष्ठ अधिकारी खलील यांचा मुलगा आणि एक सहाय्यक जिहाद यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, या हल्ल्यात कतारच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन केल्याबद्दल नेतान्याहू यांनी माफी मागत हल्ल्यात कतारी सुरक्षा रक्षकाच्या मृत्यूबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. दरम्यान, गाझामधील युद्ध संपवण्यासाठी आणि हमासने बंदी बनवलेल्यांना सोडण्यासाठी शांतता करार करण्यासाठी सध्या घडामोडी सुरू आहेत. या पार्श्वभूमीवरील कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी नेतान्याहू आणि ट्रम्प यांच्यात चर्चा सुरू आहेत.सूत्रांनी नाव न घेण्याच्या अटीवर सांगितले, की संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने अरब देशांसमोर संबंधित प्रस्ताव समोर ठेवला आहे. युद्धविरामासाठी २१ नवे मुद्दे आहेत. त्यानुसार तातडीने युद्धविराम लागू होणार असून, इस्रायलच्या ओलिसांना हमासने ४८ तासांत सोडावे, अशी अट आहे. इस्रायलच्या फौजा हळूहळू नंतर माघारी जातील.

### काही दिवसांपूर्वी हल्ला

नेतान्याहू यांच्यावर आंतरराष्ट्रीय दबाव आहे. येथे आतापर्यंत ६६ हजार पॅलेस्टिनींचा मृत्यू झाला आहे. ट्रम्प-नेतान्याहू यांच्या भेटीत हा संघर्ष संपविण्यासाठी ट्रम्प नवा प्रस्ताव समोर ठेवण्याची शक्यता आहे.युद्धविरामावर आम्ही नियोजन करीत आहोत. त्याला अंतिम रूप आलेले नाही. ट्रम्प यांच्या सहकाऱ्यांबरोबर आम्ही काम करीत आहोत. आम्ही यामध्ये नक्की पुढे जाऊकतारची राजधानी दोहा येथे इस्रायली लष्कराने काही दिवसांपूर्वी हल्ला केला होता.

# परदेशात चित्रपटांवर १०० टक्के आयातशुल्क

## ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयाबाबत हॉलीवूड निर्मात्यांमध्ये धास्ती

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विविध देशांविरोधात पुकारलेल्या आयातशुल्क ‘युद्धा’त अमेरिकेच्या डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने आता परदेशी चित्रपट निर्मिती क्षेत्रावरही निशाणा साधला आहे. परदेशात निर्मित झालेल्या चित्रपटांवर अमेरिकेत १०० टक्के आयातशुल्क लागू करणार असल्याचा ट्रम्प यांनी सोमवारी पुनरुच्चार केला. या निर्णयाचा हॉलीवूडच्या चित्रपट निर्मिती क्षेत्राला मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.**




यासंदर्भात ट्रम्प यांनी सर्वप्रथम मे महिन्यामध्ये इशारा दिला होता. याद्वारे ‘अमेरिकन फर्स्ट’ धोरणासाठी ट्रम्प यांनी आणखी एक पाऊल उचलण्याचे संकेत दिले आहेत. ट्रम्प यांनी स्वत:च्या ‘ट्रूथ सोशल’ या समाजमाध्यमावर टाकलेल्या संदेशात म्हटले आहे की, अमेरिकेतील चित्रपट निर्मिती उद्योग अन्य काही देशांनी अशा रीतीने चोरून नेला आहे, जसे एखाद्या लहान मुलीच्या तोंडातून कँडी पळवावी.मात्र हे धोरण कसे राबवणार, कोणती कायदेशीर यंत्रणा त्याची अंमलबजावणी करणार, याबाबत मात्र अजूनही अधिकृतपणे उलगडा करण्यात आलेला नाही. अमेरिकेच्या व्हाइट हाऊसनेही याबाबत कोणतीही प्रतिक्रिया देणे टाळले आहे. या धोरणामुळे चित्रपट निर्मितीचा खर्च नक्कीच वाढणार आहे आणि त्याचे ओझे साहजिकच प्रेक्षकांच्या खिशावर पडणार आहे, असे चित्रपट निर्मितीतज्ज्ञांचे मत आहे. हॉलीवूडमधील चित्रपट निर्मात्यांचा सध्या कॅनडा, ब्रिटन आणि ऑस्ट्रेलियात करसवलतीसह उपलब्धआणि चित्रपट निर्मिती सुविधा वापरण्याकडे अधिकाधिक कल आहे.

### फटका बसण्याची शक्यता

त्यातही आशिया आणि युरोपातील सहनिर्मात्यांसह चित्रपट निर्मितीकडेही त्यांचा भर असतो. हे सहनिर्माते स्थानिक वित्तपुरवठादार मिळवून देणे, बाजारपेठ मिळवून देणे आणि चित्रपट वितरणाची साखळी निश्चित करणे, यासाठी हॉलीवूडच्या निर्मात्यांना मदत करत असतात. पण नव्या धोरणामुळे या सर्व साखळीलाच फटका बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# भारतीय घरांमध्ये नवरात्रीच्या उत्सवाला विशेषत: महत्त्वाचे स्थान!

देवी दुर्गा आणि राक्षस महिषासुर यांच्यातील युद्ध ही या उत्सवामागील महत्त्वाची कथा आहे. तो एक शक्तिशाली राक्षस होता, ज्याला ब्रह्मदेवाकडून वरदान मिळाले होते, ज्यामुळे तो कोणत्याही मनुष्य किंवा देवाविरुद्ध अजिंक्य होता. तथापि, ब्रह्मदेवाकडून वरदान मिळाल्यानंतर, तो गर्विष्ठ झाला आणि त्याने स्वर्ग आणि पृथ्वीचा नाश केला. देव राक्षसांना पराभूत करू शकले नाहीत, म्हणून त्यांनी मदतीसाठी देवी दुर्गाकडे संपर्क साधला कारण ती सर्व देवतांच्या शक्ती एकत्र करून निर्माण झाली होती आणि स्त्री शक्ती आणि शक्तीचे अंतिम मूर्त रूप म्हणून उदयास आली होती. त्यानंतर, तिने सिंहावर आरूढ होऊन महिषासुराशी नऊ दिवस आणि रात्र चाललेले भयंकर युद्ध केले आणि शेवटी तिने राक्षसाचा पराभव केला. म्हणून दरवर्षी लोक नवरात्री पाळतात, वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे. देशाच्या सांस्कृतिक दिनदर्शिकेचा अविभाज्य भाग असलेल्या हिंदू धर्माच्या संदर्भात नवरात्रोत्सव हा पवित्र आहे. हा उत्सव 'शक्ती' नावाच्या देवी शक्तीला समर्पित आहे. उत्सवाच्या नऊ रात्री दुर्गा देवीची पूजा केली जाते. प्रत्येक दिवस दुर्गेच्या जीवनातील विविध भाग, शक्ती, ज्ञान, संपत्ती इत्यादी नऊ रूपांचे प्रतीक आहे.नऊ दिवसांचा सण मोठा अर्थपूर्ण आहे आणि देशभरात साजरा केल्याचा मोठा इतिहास आहे. सणाच्या हंगामाची सुरुवात विविध समुदायातील लोक देवी दुर्गा पूजेने करतात आणि अंधारावर प्रकाशाचा विजय दर्शवतात. पूजेव्यतिरिक्त, हजारो भाविक, विशेषत: गुजरातमध्ये, गरबा नृत्याने उत्सव साजरा करतात. समांतर, भव्य दुर्गा पूजा देशभरात आयोजित केल्या जातात, ज्यामुळे हा भक्तिपूर्ण उपवास आणि प्रार्थनांचा उत्सव बनतो.बहुप्रतीक्षित नवरात्रोत्सव देखील प्रतिबिंब आणि नूतनीकरणाची संधी देते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवरात्री लोकांना एकत्र आणणारी, शक्ती, भक्ती आणि अंधारावर प्रकाशाच्या विजयाचे प्रतीक आहे.



## नवरात्र म्हणजे काय?

1 नवरात्र हा एक हिंदू सण आहे जो नऊ रात्रींमध्ये साजरा केला जातो, जो देवी दुर्गा आणि तिच्या नऊ अवतारांच्या उपासनेला समर्पित आहे. हे वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे आणि उपवास, प्रार्थना, नृत्य आणि सांस्कृतिक उत्सवांद्वारे चिन्हांकित केले जाते.

2 नवरात्री 2024 कधी साजरी केली जाते? नवरात्री 2024 गुरुवार, 3 ऑक्टोबर 2024 रोजी सुरू होईल आणि शनिवारी, 12 ऑक्टोबर 2024 रोजी विजया दशमीला समाप्त होईल.

3 नवरात्री 2024 च्या प्रमुख तारखांमध्ये 3 ऑक्टोबर 2024 रोजी घटस्थापना, 11 ऑक्टोबर 2024 रोजी दुर्गाष्टमी, 11 ऑक्टोबर 2024 रोजी महानवमी आणि 12 ऑक्टोबर 2024 रोजी विजया दशमी यांचा समावेश आहे.

4 नवरात्री म्हणजे चांगल्या आणि वाईट यांच्यातील युद्धाच्या नऊ रात्री, ज्याचा शेवट चांगल्याच्या विजयात होतो. हे देवी दुर्गेचा महिषासुरावरचा विजय आणि रावणावर भगवान रामाचा विजय साजरा करते, जे वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे.

5 भारतभर नवरात्री मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. उत्तर भारतात उपवास आणि प्रार्थना यांचा समावेश आहे. गुजरात आणि महाराष्ट्रात लोक गरबा आणि दांडिया नृत्य करतात. पूर्व भारतात, दुर्गा पूजा भव्य पंडाल आणि सांस्कृतिक उपक्रमांसह साजरी केली जाते. गोव्यात, विशेष जत्रा आणि मंदिराची सजावट सणाचे प्रतीक आहे, तर केरळमध्ये आयुधा पूजा केली जाते.

चषकातील वादळ!

## मैदानाबाहेरील राजकारण, चर्चा अधिक रंगली

# आशिया चषक घेऊन नक्वी पसार!

## बीसीसीआय संघर्षाच्या पवित्र्यात




। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेत मैदानावरील खेळापेक्षा, भारत आणि पाकिस्तान या संघांतील खेळाडूंच्या विविध कृती, मैदानाबाहेरील राजकारण याचीच चर्चा अधिक रंगली. या स्पर्धेची सांगताही अतिशय नाट्यमय आणि वादग्रस्त ठरली. स्पर्धेचे जेतेपद पटकावल्यानंतरही भारतीय संघाला चषकाविनाच मायदेशी परत यावे लागणार आहे. एसीसी आणि पीसीबीचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्याकडून चषक स्वीकारण्यास नकार दिल्यानंतर, नक्वी चषक वितरित न करताच परतल्यामुळे पेच वाढला असून आता याविरोधात बीसीसीआय आयसीसीकडे दाद मागणार आहे.**

स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच रंगलेला भारत-पाकिस्तान वाद रविवारी, चषक वितरण सोहळ्यात टिपेला पोहोचला. विजेत्या भारतीय संघाने आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्याकडून चषक घेण्यास नकार दिला. नक्वी हे पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे (पीसीबी) अध्यक्ष आणि पाकिस्तान सरकारमध्ये अंतर्गत सुरक्षामंत्री म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांनी अनेकदा भारतविरोधी भूमिका घेतली आहे. त्यामुळे त्यांच्या हातून आम्ही चषक स्वीकारणार नाही अशी भारतीय संघाची भूमिका होती. भारतीय संघ अमिराती क्रिकेट मंडळाचे उपाध्यक्ष खालिद अल झरूनी यांच्याकडून चषक घेण्यास तयार होता.मात्र, 'एसीसी' अध्यक्ष या नात्याने विजेत्या संघाला चषक मीच देणार, असे नक्वी यांचे म्हणणे होते. भारतीय संघ आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने नक्वी मैदानातून चालते झाले. मात्र, जाताना 'एसीसी'च्या पदाधिकाऱ्यांसह चषकही घेऊन गेले. नक्वी यांच्याविरोधात आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) तक्रार नोंदविण्याची भूमिका भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) घेतली आहे. सध्या आशिया चषक 'एसीसी'च्या दुबईतील मुख्यालयात ठेवण्यात आल्याचे समजते.अंतिम सामना संपल्यानंतर पारितोषिक वितरण सोहळा सुरू होण्यास तासभराहून अधिक कालावधी लागला. भारतीय संघ मैदानात असताना पाकिस्तानी खेळाडू ड्रेसिंग रूममध्येच बसून राहिले. त्यामुळे ते मैदानात आल्यानंतर भारतीय चाहत्यांनी त्यांच्याविरोधात शेरेबाजी केली. नक्वी व्यासपीठावर आली तेव्हाही 'भारतमाता की जय'च्या घोषणा देण्यात आल्या.भारतीय संघाने नकार दिल्यानंतर संतप्त झालेले

## भारतीय चाहत्यांकडून हुर्यो

भारतीय संघ आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने नक्वी मैदानातून चालते झाले. मात्र, जाताना 'एसीसी'च्या पदाधिकाऱ्यांसह चषकही घेऊन गेले. क्रिकेट परिषदेकडे तक्रार नोंदविण्याची भूमिका भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) घेतली आहे. सध्या आशिया चषक 'एसीसी'च्या दुबईतील मुख्यालयात ठेवण्यात आल्याचे समजते.

नक्वी मैदानातून चषकासह निघून गेले. मात्र भारतीय संघाने त्यांना छेडण्याची ही संधीही दवडली नाही. 'सोहळ्या समाप्ती'च्या घोषणेनंतर भारतीय संघाने हातात 'चषक' पकडल्याची कृती करत जल्लोष साजरा केला. यावेळी आतषबाजी करण्यात आली. भारतीय संघातील खेळाडूंनी 'चषका'सह छायाचित्रे समाजमाध्यमांवरूनही प्रसारित केली. आमच्या देशाविरोधात युद्ध पुकारणाऱ्या व्यक्तीकडून (नक्वी) आम्ही चषक घेणार नाही, अशी आमची ठाम भूमिका होती. मात्र, यामुळे त्या व्यक्तीला चषक आणि पदके आपल्याबरोबर घेऊन जाण्याचा अधिकार मिळत नाही. त्यांची कृती अतिशय निंदनीय आणि बालिश आहेस्पर्धेच्या सुरुवातीपासूनच रंगलेला भारत-पाकिस्तान वाद रविवारी, चषक वितरण सोहळ्यात टिपेला पोहोचला. विजेत्या भारतीय संघाने आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्याकडून चषक घेण्यास नकार दिला. नक्वी हे पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे (पीसीबी) अध्यक्ष आणि पाकिस्तान सरकारमध्ये अंतर्गत सुरक्षामंत्री म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांनी अनेकदा भारतविरोधी भूमिका घेतली आहे. त्यामुळे त्यांच्या हातून आम्ही चषक स्वीकारणार नाही अशी भारतीय संघाची भूमिका होती. भारतीय संघ अमिराती क्रिकेट मंडळाचे उपाध्यक्ष खालिद अल झरूनी यांच्याकडून चषक घेण्यास तयार होता.मात्र, 'एसीसी' अध्यक्ष या नात्याने विजेत्या संघाला चषक मीच देणार, असे नक्वी यांचे म्हणणे होते.

# भारतीय संघाकडून क्रिकेटचा अपमान!

## हस्तांदोलन टाळण्यावरून सलमान आघाची टीका




। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघाने पाकिस्तानी खेळाडूंशी हात न मिळविण्याची घेतलेली भूमिका ही क्रिकेटचा अनादर करणारी होती आणि क्रिकेटपटूंना आदर्श मानणाऱ्या तरुण चाहत्यांसमोर खिलाडूवृत्तीचे हे उदाहरण निश्चितपणे नव्हते, असे वक्तव्य पाकिस्तानचा कर्णधार सलमान आघा याने केले.**

“या स्पर्धेत भारतीय संघाने जी कृती केली, ती अतिशय निराशाजनक होती. हस्तांदोलन न करणे किंवा चषक न स्वीकारण्याची त्यांची भूमिका ही आमचा नाही, तर क्रिकेटचा अपमान करणारी होती. चांगला संघ कधीच असे करत नाही,” असे सलमान म्हणाला.“अंतिम सामन्यापूर्वी दोन्ही संघांच्या कर्णधारांनी चषकाबरोबर एकत्रित छायाचित्र काढायचे असते. त्यांनी ते केले नाही. मी छायाचित्र काढून घेतले, कारण आम्हाला आमच्या जबाबदारीची जाणीव आहे. लढतीनंतर आम्ही तिथे उभे राहून पदके घेतली. मला कठोर शब्द वापरायचे नाहीत. मात्र, भारतीय संघाकडून

## पाकिस्तानकडूनही दान...

हस्तांदोलन करायचे की नाही, याचा निर्णय सूर्यकुमारवर सोडला असता, तर त्याने नक्कीच वेगळी भूमिका घेतली असती. त्याने हात मिळवणे अशाप्रकारे टाळले नसते,” असेही सलमान म्हणाला.भारतीय संघाला चषक न देण्याचेही सलमानने समर्थन केले. “आतापर्यंत आशियाई क्रिकेट परिषदेचे प्रमुखच विजेत्या संघाला चषक प्रदान करत होते.

जे काही घडले, ते पूर्णपणे क्रिकेटचा अनादर करणारे होते,” याचा सलमानने पुनरुच्चार केला. सलमान आघाने या वेळी भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवची भूमिका न पटणारी होती हेच वारंवार सांगितले. “खासगीत तो ज्या पद्धतीने वागला, त्यापेक्षा सार्वजनिक ठिकाणी तो वेगळा वागला. हे अनाकलनीय आहे. स्पर्धापूर्व पत्रकार परिषद आणि पंचांच्या बैठकीला आम्ही एकत्र आलो, तेव्हा सूर्यकुमारने माझ्याशी हस्तांदोलन केले. कॅमेऱ्यासमोर आलो, तेव्हा त्याने हस्तांदोलनास विरोध केला. त्याला तसे करण्यास कोणीतरी सांगितले असणार हे मला ठाऊक आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार।
। दि. 30 सप्टेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### सरचिटणीस विकास डोळस यांचे मदतकार्याचे आवाहन

# राज्यातील महापूरग्रस्तांसाठी “एक हात मदतीचा”!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची यंत्रणा लागली कामाला

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांपासून राज्यातील अनेक जिल्ह्यांना अतिमुसळधार पावसाने झोडपले आहे. मराठवाडा, विदर्भ, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्राच्या काही भागात अक्षरश: ओला दुष्काळ पडला आहे. अनेक संसार उद्ध्वस्त झाले असून, शेतकरी हतबल झाला आहे. अशा परिस्थितीमध्ये वाढदिवस किंवा सभा-समारंभांवर अनावश्यक खर्च न करता आपत्ती ग्रस्तांसाठी ‘एक हात मदतीचा’ देण्याचा संकल्प करण्यात आला आहे, अशी माहिती भाजपा सरचिटणीस विकास डोळस यांनी दिली.**

**आमदार महेशदादा लांडगे यांच्या सुवर्ण महोत्सवी ५० व्या वाढदिवसानिमित्त**

मराठवाडा पूरग्रस्तभागातील ५० गावांना मदतीचा संकल्पित निर्धार




मराठवाडा, धाराशिव, लातूर, अहिल्यानगर, सोलापूर व इतर पुरग्रस्त भागात झालेल्या भीषण पूरस्थितीमुळे शेकडो कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहे जनजीवन विस्कळीत झाले आहे. तेथील पूरग्रस्त पीडितांना आपण मदत गोळा करून घेऊन जाणार आहोत त्यासाठी तुमच्या मदतीची अपेक्षा आहे तरी आपण सढळ हाताने मदत करावी.




**: साहित्य :**

**३ किलो तांदूळ, २ किलो पीठ, १ किलो तुर डाळ,१ तेल पॅकेट,१ मीठाचे पॅकेट, ५० ग्राम मिर्ची पावडर, ५० ग्राम हळदी पावडर, पाणी जार, बिस्किट, ब्लँकेट, कपडे इ.**

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्त्वाखाली ‘एक हात मदतीचा’ उपक्रम सुरू केला आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, जालना, नांदेड, परभणी, बीड, लातूर, हिंगोली या जिल्ह्यात शेती आणि शेतकरी यांचे मोठे नुकसान झाले. राज्यातील भाजपा महायुती सरकार सर्वोतोपरी मदतकार्य करीत आहे. पण, महापूरात संकटगस्त असलेल्या शेतकरी-कष्टकरी यांचा दसरा- दिवाळीवर ‘संक्रांत’ ओढावली आहे. शेवटच्या घटकाचीसुद्धा दिवाळी गोड झाली पाहिजे. यासाठी आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला असून, शहरवासीयांना मदत उभा करण्याचे आवाहन केले आहे.

सांगली-सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यातील महापूर आणि कोकणातील चक्रीवादळाच्या काळात आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडमधून मोठ्या प्रमाणात मदतकार्य केले होते. आता मराठवाडा आणि पूरग्रस्त भागात लोकसहभाग आणि वैयत्तीक अशी मदत करण्याचा संकल्प आमदार लांडगे आणि सहकाऱ्यांनी केला आहे. विकास डोळस म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमधील मराठवाडास्थित स्वयंसेवी संस्था, संघटना आणि दानशूर व्यक्तींनी मराठवाडासह अन्य भागातील आपत्तीग्रस्तांना मदत करण्यासाठी श्री. सुहास ताम्हाणे : 8087596196 यांच्याशी संपर्क करावा. तसेच, औद्योगिक व व्यापार क्षेत्रातील दानशूर व्यक्तींनी श्री. शुभम मानमोडे : 84467 52571 यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन केले आहे.

### अशी करता येईल मदत!

पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांनी मराठवाडा व इतर पुरग्रस्त भागात झालेल्या भीषण पूरस्थितीमुळे शेकडो कुटुंबाचे संसार उद्ध्वस्त झाले आहे. जनजीवन विस्कळीत झाले आहे. तेथील पूरग्रस्थ पीडितांना आपण मदत करु शकता. तांदुळ, पीठ, तुरडाळ, तेल पॅकेट, मीठ-मिर्ची पावडर, हळद पावडर, पाणी जार, बिस्किट आणि ब्लॅंकेट व कपडे अशा स्वरुपात मदत करता येईल. एका कुटुंबाला किमान एक महिन्यांची भोजन व्यवस्था होईल, असे पॅकेट १ हजार रुपयांपर्यंत तयार करण्यात येईल. अशा स्वरुपात मदत करण्यासाठी श्री. संजय पटनी यांच्यासोबत 9822217163 संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. भोसरी येथील महेशदादा स्पोर्ट्स फॉउंडेशन मैदान येथे प्रत्यक्ष मदत स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

“ पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणमध्ये नैसर्गिक आपत्ती आली होती. त्यावेळी आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘एक हात मदतीचा’ हा विधायक उपक्रम आम्ही हाती घेतला होता. आता राज्यात जे आस्मानी संकट उभे राहीले आहे. त्यामध्ये शेवटच्या घटकाला मदत व्हावी आणि किमान एका कुटुंबाची दिवाळी गोड करता यावी, अशा मदतकार्याचा संकल्प आम्ही केला आहे. शहरातील नागरिकांनी सामाजिक जाणिवेतून या उपक्रमात योगदान द्यावे, असे आवाहन करतो.

**-- विकास डोळस, सरचिटणीस, भाजपा.**

विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवडमध्ये वास्तव्य करणारे मराठवाड्यातील नागरिकांना आपल्या नातेवाईकांना मदत करायची असेल. त्यांनी श्री. अनिकेत गायकवाड : 89758 96999 आणि श्री. संदीप ठाणेकर : 97656 49797 यांना संपर्क करावा. आम्ही सर्वोतोपरी मदतकार्य करण्यासाठी कटिबद्ध आहोत.

---

### मास्टर माईंड ग्लोबल स्कूलमध्ये शारदीय नवरात्रोत्सवाचा उत्साह

## आठव्या दिवशी मोरपंखी हिरव्या रंगात देवी महागौरीची आराधना

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये शारदीय नवरात्रोत्सवाचा आठवा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. परंपरेनुसार आजची माळ देवी महागौरी यांना अर्पण करण्यात आली. यानिमित्ताने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोरपंखी हिरव्या रंगाचे वस्त्र परिधान करून देवीची आराधना केली.**

**मोरपंखी रंगाचे प्रतिकात्मक महत्त्व**

नवरात्रीच्या प्रत्येक दिवशी विशिष्ट रंगाचा वापर करण्याची परंपरा आहे. आठव्या दिवशीचा रंग मोरपंखी हिरवा हा नव्या जीवन, सौंदर्य, समृद्धी आणि उत्कर्ष यांचे प्रतीक मानला जातो. महागौरी देवीला हा रंग प्रिय असल्याने भक्तगण हा दिवस विशेष भक्तिभावाने साजरा करतात.

**भक्ती आणि शांतीचा संदेश**

हा रंग भक्तीला सौम्यता व शांतीचा स्पर्श देतो तसेच आशा, नवनिर्माण आणि सकारात्मकतेची ऊर्जा निर्माण करतो. शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या दिवशी देवीची आराधना करून सांस्कृतिक परंपरेचे जतन आणि आध्यात्मिक उर्जा अनुभवली.



Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.


PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

Admission Schedule for
F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046